नि.फौ.ख.क्र.१२६ /२०२०
सरकार वि. अतुल
नि.क्र.३३

साक्षीदार क्र **०२** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–कवसाबाई रामाजी भोयर
वय:–७० वर्ष, व्यवसाय–मजुरी
राह.मानोली, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.व्ही.यु.मिरचे यांच्या मार्फत</u>**

१. घटना अंदाजे २ –०३ वर्षापुर्वीची आहे. घटना संध्याकाळी ६.०० वाजता घडली होती. सदर दिवशी मी माझ्या घरी होते. त्यावेळी माझा नातु हा भांडण करित होता त्यावेळी मी त्याला आडवे व्हायला गेली. त्यावेळी त्यांनी मला आरोपीने टेंप्याने मारले. त्यामुळे माझा हात मोडला व माझ्या डोक्याला मार लागुन टाके पडले. आरोपी अतुल अराडे याने मला टेंम्पा मारला होता व त्यांच्या बायकोनेसुध्दा मला टेम्पा मारला होता. त्यावेळी आरोपीने मला मारले व माझा नातु आदेश यालासुध्दा मारले. त्यानंतर आम्ही सिर्सी येथे दवाखाण्यात गेलो व तेथुन पो.स्टेशनला गेलो. मी सिर्सी येथील सरकारी दवाखाण्यात गेले होते व माझ्या हाताचा दवाखाना सेवाग्राममध्ये केला होता. पोलिस चौकशीकामी आले होते. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. ज्या टेंप्याने (झिलप्याने) मला मारले होते ते दाखविल्यास मी ओळखु शकते. आता मला जी.पी.न.७२/२० लाकडी दांडा असलेली कु–हाड दाखविण्यात आली ती तीच आहे त्याला **एम.ओ.०१** देण्यात आला. मला ज्या आरोपीने मारले होते त्या आरोपीला पाहिल्यास मी ओळखते तो न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड.आर.बी.भोंबे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

२. फिर्यादी माझी मुलगी आहे. मी पोलिसांना बयाण देतेवेळेस त्यावेळी माझा नातु भांडण करित होता त्यावेळेस आरोपीने मला टेंप्याने मारले, मला अतुल अराडे व त्यांच्या बायकोने मारले होते, त्यावेळी आरोपीने मला मारले व माझा नातु आदेश यालासुध्दा मारले, तसेच आरोपीने टेंप्याने मारले होते ह्या बाबि सांगितल्या होत्या. आता मला माझे बयाण दाखविण्यात आले त्यामध्ये सदर मजकुर जसाच्या तसा नमुद नाही तो का नमुद नाही याचे कारण मला सांगता येत नाही.

३. पोलिसांनी माझे बयाण ज्या दिवशी दवाखाण्यात गेले त्या दिवशी घेतले होते व सेवाग्राम दवाखाण्यातसुध्दा घेतले होते. मी दवाखाण्यामध्ये घटना घडल्यानंतर २–३ दिवसाने गेले होते. फिर्यादी सुनिता ही माझ्याच घरी राहते. फिर्यादी सुनिता हिला आदेश नावाचा एक मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी सुनिता हिचा मुलगा आदेश याला दारूचे व्यसन आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचा मुलगा आदेश हा दारू पिउन माझ्यासोबत व माझ्या मुलीसोबत भांडण करित होता. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी घटना घडली त्या दिवशी फिर्यादीचा मुलगा आदेश हा दारू पिउन होता. हे म्हणणे खरे आहे की, आदेश दारू पिउन असल्यामुळे त्याचा त्याच्या आईसोबत झगडा झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी लोक हे फिर्यादीला वाचविण्यासाठी तेथे आले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलगी सुनिता व माझा नातु आदेश यांच्या झगड्यामध्ये माझी मुलगी सुनिता हिला मार लागला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमचे झगड्याच्या पुर्वीपासुनच पटत नाही.

०४. मी रोज बक–या चारायला जाते. मी उन्हाळ्यामध्ये सकाळी ७.०० वाजता बक–या चारण्यासाठी नेते व इतर वेळी दुपारी १२.०० वाजता बक–या चारण्यासाठी जाते. हे म्हणणे खरे आहे की, घटना माझ्यासमक्ष घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या मुलीला, मला व माझ्या नाताला केव्हाही मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपीने मारहाण केली नाही त्यामुळे मी दवाखाण्यात गेली नाही. पोलिसांनी माझ्याकडुन दवाखाण्याचे कागदपत्र घेतले होते. आता मला दोषारोपपत्र दाखविले असता त्यामध्ये माझे दवाखाण्यचे कागदपत्र असल्याचे दिसुन येत नाही.

०५. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझ्या घराच्या मधील जागेमध्ये सरकारी विहीर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर विहीर सपाट जमीनलेवलची आहे. हे मला माहीत नाही की, आरोपीला त्यावेळी एक दोन वर्षाचा मुलगा होता किंवा कसे. आरोपी माझ्या घराच्या बाजुला राहतो. आरोपी माझ्या घराच्या बाजुला २–४ वर्षापासुन राहतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला दिड ते दोन वर्षाचा मुलगा आहे ही बाब मला माहीत असुनही मी कोर्टात सांगत नाही.

**प्रश्न–**आरोपीचा दिड ते दोन वर्षाचा मुलगा असल्यामुळे तो मुलगा विहीरीमध्ये पडण्याची भिती त्यांना होती काय?

**उत्तर–**त्यांनाही होती व आम्हालाही होती.

हे मला माहीत नाही की, त्यावेळी आरोपीने सदर विहीरीवर जाळी टाकतो असे म्हटले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्या मुलीने विहीरीवर जाळी टाकु नका म्हणुन विरोध केला होता. हे म्हणणे खरे आहे की, आमचा विरोध असल्यामुळे ग्रामपंचायतवाल्यांनी विहीरीवर जाळी टाकली.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, सदर घटना होण्यापुर्वी माझ्या मुलीचा अपघात झाला होता. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, ज्यावेळेस माझा जावाई मरण पावला होता त्यावेळी माझ्या मुलीचा अपघात झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपघातामध्ये माझ्या मुलीच्या तोंडाला मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलीला सदर अपघातामध्ये दुखापत झाल्यामुळे त्याचा गैरफायदा घेउन मी आरोपीविरूध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की,ज्यावेळी माझा नातु दारू पिउन आला त्यावेळी त्याचे माझ्या मुलीसोबत भांडण झाले होते व त्या भांडणामध्ये माझ्या मुलीला त्याच्याकडुन मार लागला होता. मी बक–या राखत असल्यामुळे मला टेंम्पे आणि कु–हाड यामधील फरक समजतो. आता मला एम.ओ.०१ कु–हाड ही दाखविली ते टेम्पे नाही. एम.ओ.०१ सारख्या कु–हाडी शेतक–यांच्या घरी असतात. हे म्हणणे खरे नाही की, एम.ओ.०१ सारखी कु–हाड माझ्या घरी आहे. हे म्हणणे खरे आहे की, एम.ओ.०१ कु–हाड माझ्या मुलीनेच पोलिसांना दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझी मुलगी असल्यामुळे मी तिच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि२४.०२.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड